


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : २२६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.२९ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## अयोध्येत महायज्ञात आग, नारळ फुटताच मंडप जळून खाक

### राम मंदिरापासून हाकेच्या अंतरावर अग्नितांडव

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, अयोध्या :** उत्तर प्रदेशातील अयोध्येत शनिवारी मोठी दुर्घटना घडली. शरयू नदीच्या तीरावर महायज्ञाचं आयोजन करण्यात आलेलं असताना आगीची घटना घडली. आगीच्या ज्वाळा वेगानं पसरल्या. त्यामुळे मंडप जळून खाक झाला. या महायज्ञात सहभागी होण्यासाठी जवळपास ५० हजार जण आले होते. आग लागताच एकच खळबळ उडाली आणि सगळ्यांचीच पळापळ सुरु झाली. अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. त्यांनी आग नियंत्रणात आणली. यज्ञात आहुती म्हणून अर्पण केलेला नारळ फुटल्यानं दुर्घटना घडल्याचं सांगितलं जात आहे.

उत्तर प्रदेश सरकारमधील परिवहन मंत्री दयाशंकर सिंह यांच्याकडून शरयू नदीच्या तीरावर महायज्ञाचं आयोजन करण्यात आलं होतं. महायज्ञाचं ठिकाण अयोध्येतील राम मंदिरापासून केवळ ८०० मीटर अंतरावर आहे. मंत्री दयाशंकर सिंह यांनी आयोजित केलेल्या महायज्ञासाठी गोसाईगंजचे आमदार अभय सिंहदेखील आले होते.

महायज्ञात टाकण्यात आलेला एक नारळ अचानक फुटला आणि त्यामुळे आग लागल्याचं सांगितलं जात आहे. आगीची तीव्रता अतिशय जास्त होती. संपूर्ण मंडप या आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. घटनेची माहिती अग्निशमन दलाला तातडीनं देण्यात आली. यानंतर पुढच्या काही मिनिटांत अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी पोहोचल्या. सुदैवानं या आगीत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



यज्ञ मंडपात अचानक आग लागली. अग्निशमन दलाच्या जवानांनी आग त्वरित नियंत्रणात आणली. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नसून परिस्थिती नियंत्रणात असल्याची माहिती परिवहन मंत्री दयाशंकर सिंह यांनी दिली. आगीची घटना शनिवारी दुपारी बाराच्या सुमारास घडली. गेल्या ९ दिवसांपासून महायज्ञ सुरु होता. आज महायज्ञाचा अखेरचा दिवस होता. त्यामुळ गर्दी कमी होती.

या महायज्ञाच्या कार्यक्रमात ५० हजार भाविक सहभागी झाले होते. अखेरच्या दिवशी १,२५१ हवन कुंड तयार करण्यात आले होते. या यज्ञांमध्ये ५ हजार जणांनी मंत्रोच्चारण करुन आहुती दिली. ज्यावेळी आग लागली, तेव्हा बहुतांश मंडप रिकामा झाला होता. बरेसचे भाविक परतले होते. त्यामुळे मोठी दुर्घटना टळली.

## भाविकांसाठी आनंदाची बातमी!

### चैत्रोत्सवानिमित्त सप्तश्रृंग गडासाठी दर १५ मिनिटांनी बस



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, नाशिक :** चैत्र पोर्णिमेनिमित्त सप्तशृंगगड येथे होणाऱ्या उत्सवासाठी राज्य मार्ग परिवहन महामंडळाने २५० बसेसचे नियोजन केले आहे. निमाणी बस स्थानकातून सप्तशृंगगडासाठी दर १५ मिनिटांनी बस सोडण्याचे नियोजन केले आहे, तर नांदुरी पायथ्यापासून प्रत्येक पाच मिनिटांनंतर गडावर बस सोडण्यात येणार आहे.

चैत्र पोर्णिमा उत्सव हा सप्तशृंगगडावरील प्रमुख धार्मिक सोहळा असतो. उत्तर महाराष्ट्रासह राज्यभरातून मोठ्या संख्येने भाविक या उत्सवासाठी येत असतात. गडावर होणारी गर्दी लक्षात घेऊन भाविकांच्या सोयीसाठी दरवर्षी एसटी महामंडळाकडून जादा बसेसचे नियोजन करण्यात येते. यंदाही भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी मोठ्या संख्येने बसेस सोडण्याचा निर्णय महामंडळाने घेतला आहे.

३ एप्रिलपर्यंत ही जादा वाहतूक सुरू राहणार आहे. याकरिता जिल्ह्यातील काही बसस्थानकांमध्ये जादा वाहतूक केंद्र उभारण्यात आले आहेत. निमाणी बसस्थानक, नांदुरी पायथा आणि सप्तशृंगगड वाहनतळ येथे महामंडळाने यात्रा वाहतूक केंद्र उभारले आहे. मालेगाव, मनमाड, सटाणा आणि नांदगाव येथूनही जादा बसेस सोडण्यात येणार आहेत.

**भाविकांसाठी अनेक सुविधा...**

गडावर येणाऱ्या भाविकांसाठी अल्पदरात निवास व्यवस्था, तसेच शिवालय तीर्थ येथे मोठ्या प्रमाणात निवारा शेड (मंडप) उभारण्यात आला आहे, ई-टॉयलेटची व्यवस्था, पाणपोई, चप्पल स्टँडची सोय करण्यात आली आहे. अखंडित वीजपुरवठ्यासाठी तीन जनरेटरची व्यवस्था करण्यात आली असून, गडपरिसर स्वच्छ ठेवण्यासाठी हंगामी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे . यात्रेच्या कालावधीत ( दि. २६ मार्च ते ३ एप्रिल ) गडावर खासगी वाहतूक पूर्णतः बंद ठेवण्यात आली असून , नांदुरी येथून एसटी बसद्वारे भाविकांची ने-आण करण्यात येत आहे. तसेच गडापासून एक किमी अंतरावर सालाबादप्रमाणे तात्पुरते बसस्थानक उभारण्यात आले आहे. दरम्यान, सुप्रसिद्ध मराठी अभिनेते चिन्मय उदगीरकर यांनी गुरुवारी (दि. २६) सप्तशृंगी देवीची आरती करून दर्शन घेतले.

## दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या ३५७ नमुन्यांची तपासणी, कारवाई केवळ तिघांवर

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.२८, सोलापूर :** अन्न व भेसळ प्रतिबंधक विभाग, सोलापूर कार्यालयाच्या वतीने जिल्ह्यात भेसळयुक्त दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या अनुषंगाने २०२४-२५ या वर्षात मोहीम राबवून ३५७ ठिकाणच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यापैकी ३३५ नमुने घेण्यात आले असून तिघांवर कारवाई करण्यात आल्याची माहिती अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाचे अधिकारी सुनील जिंतूरकर यांनी दिली.



तपासणी करण्यात आलेल्या पदार्थांमध्ये दुधाचे ५६, तुपाचे २४, मिठाईचे ६८, ड्रायफ्रूटचे १९, चॉकलेटचे १६, खव्याचे २८ तर इतर ७६ असे जवळपास ३३५ नमुने अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाच्या पथकाने तपासले. ७ पदार्थांचा दर्जा अयोग्य असल्याचे दिसून आले. यामध्ये एक तपासणी ही पॅकिंग लेबलच्या अनुषंगाने करण्यात आली. या तपासणीमध्ये तीन ठिकाणी भेसळ आढळून आल्याने आणि ते पदार्थ खाण्यास अयोग्य असल्याचे दिसून आल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे.

सोलापूर विभागाच्या वतीने तब्बल १९० नमूने तपासणीसाठी मुंबई येथील राष्ट्रीय आरोग्य प्रयोगशाळेत पाठविण्यात आले असून त्याचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. हा अहवाल प्राप्त होताच दोषींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिंतूरकर यांनी सांगितले.

**महिन्याला दहा नमुने...**

अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाच्या वतीने दर महिन्याला जिल्ह्यातील दुध भेसळीच्या अनुषंगाने सरप्राईज व्हिजिट दिली जाते. यात दूध उत्पादक शेतकरी, किरकोळ दूध विक्रेते, ठोक दूध विक्रेते या ठिकाणी व्हिजिट देवून दूधाची तपासणी करण्यात येते.

**भेसळयुक्त दुधासंदर्भात कारवाई**

२०२४ साली पंढरपूर तालुक्यातील सोगाव, भोसे येथे अन्न व भेसळ प्रतिबंधक विभागाच्या वतीने मोठी कारवाई करण्यात आली. या कारवाईत या ठिकाणी केमिकल मिश्रित दूध आढळून आले. संबंधित व्यक्तीवर गुन्हा दाखल केला. खटला चालवण्यात आला. सध्या त्याच्यावर एमपीडीए अंतर्गत कारवाई केली असून, सध्या तो तुरुंगात शिक्षा भोगत आहे.

**छोट्यांवर कारवाई मोठ्यांचं काय?**

अन्न भेसळ प्रतिबंधक विभागाच्या वतीने आता किरकोळ दूध विक्रेते आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दुधाचीही तपासणी करण्यात येत आहे. दुधाची तपासणी होते ही बाब चांगली असली तरी या छोट्या कारवायामुळे जे खऱ्या अर्थाने दूध भेसळ करतात त्यांच्याकडे लक्ष देण्यासाठी पथकाकडे वेळच नसतो. त्यामुळे किरकोळ दूध विक्रेत परेशान होतात. तर भेसळ करणारे मोठे भेसळखोर मोकाट फिरतात ही वस्तुस्थिती आहे.

**जनजागृती गरजेची...**

अन्न व भेसळ विभागाच्या वतीने जिल्ह्यात मागील वर्षी ३ जनजागृती शिबिरे घेण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील ३१० व्यक्तींना अन्न व भेसळ प्रतिबंधक कायद्याच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. दूधजन्य पदार्थामध्ये मोठ्या प्रमाणावर भेसळ होत असल्याची चर्चा असते. परंतु जनजागृती झाल्यास तक्रार करायला लोक समोर येतील व त्याप्रमाणात कारवाई सुध्दा करता येईल.

## माजी हॉकीपटूचा अपघातात मृत्यू

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, नागपूर :** कामठी-नागपूर महामार्गावर वाढत्या अपघातांच्या मालिकेत आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली असून, राष्ट्रीय स्तरावर हॉकी खेळलेले माजी खेळाडू कार्तिक राजना अरगुल्लेवार (वय ५९) यांचा अपघातात मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे क्रीडा वर्तुळासह कामठी परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, हा अपघात केवळ एका व्यक्तीचा जीव घेऊन गेला नाही, तर महामार्गावरील बेफाम वेग आणि निष्काळजी वाहनचालकांबाबत गंभीर प्रश्नही उपस्थित करत आहे.

**एकूण घटनाक्रम...**

गुरुवारी भेंडीखाना परिसरात हा अपघात घडला. कार्तिक अरगुल्लेवार हे साऊथ ईस्ट सेंट्रल रेल्वेमध्ये मोतीबाग येथे टेक्निशियन ग्रेड-१ म्हणून कार्यरत होते. नेहमीप्रमाणे ते आपल्या ॲक्टिवा दुचाकीने (एमएच ४० बीआर ३८०३) कर्तव्यावरून घरी परतत होते. मात्र, त्यांच्या प्रवासाचा शेवट अत्यंत दुर्दैवी ठरला. महामार्गावरून जात असताना अचानक त्यांची दुचाकी घसरली. ते रस्त्यावर पडताच मागून वेगाने येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने त्यांना जोरदार धडक दिली. या धडकेत वाहनाचे चाक त्यांच्या डोक्यावरून गेल्याने ते गंभीर जखमी झाले. स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेत त्यांना कामठी उपजिल्हा रुग्णालयात हलवले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

## सांगलीच्या कारागृहात गँगवार, दोन टोळ्या समोरासमोर...

### १६ जणांकडून दोन सराईत गुंडांना विटांनी बेदम मारहाण

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, सांगली :** सांगली कारागृहातील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. कारागृहाच्या आवारातच दोन सराईत गुन्हेगारांच्या टोळ्यांमध्ये भीषण राडा झाला असून, १६ जणांच्या टोळीने दोन गुंडांना विटांनी बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या वर्चस्ववादातून झालेल्या हाणामारीमुळे कारागृह प्रशासनाची मोठी धावपळ उडाली असून परिसरात खळबळ माजली आहे.

**नेमकी घटना काय?**

सांगली कारागृहातील खुल्या मैदानात कैद्यांना सोडण्यात आले असताना हा प्रकार घडला. जखमी झालेला पवन साळुंखे हा एक सराईत गुन्हेगार असून, त्याच्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी 'एमपीडीए' अंतर्गत कारवाई करून त्याला एक वर्षासाठी स्थानबद्ध केले आहे. त्याचा साथीदार मेघशाम ऊर्फ मोठ्या जाधव हा देखील गुन्हेगारी पार्श्वभूमीचा असल्याने या दोघांना सुरक्षेच्या कारणास्तव वेगळ्या बरॅकमध्ये ठेवण्यात आले होते.




दुसरीकडे, त्यांचे कट्टर विरोधक मानले जाणारे आदित्य पवार आणि त्याचे १६ साथीदार वेगवेगळ्या गुन्ह्यांखाली याच कारागृहात दुसऱ्या बरॅकमध्ये बंदिस्त आहेत. शनिवारी जेव्हा या दोन्ही टोळ्यांतील सदस्य कारागृहाच्या खुल्या मैदानात समोरासमोर आले, तेव्हा त्यांच्यात शाब्दिक चकमक सुरू झाली.

**स्वत:ला शहाणे समजता का?**

मिळालेल्या माहितीनुसार, आदित्य पवारच्या टोळीने पवन साळुंखे आणि मेघशामला उद्देशून डिवचण्यास सुरुवात केली. तुम्हाला वेगळ्या बरॅकमध्ये ठेवले आहे, म्हणून तुम्ही स्वतःला जास्त शहाणे समजता का? असा सवाल करत १६ जणांच्या टोळीने त्यांना घेरले. यातून वादावादी वाढली आणि त्याचे रूपांतर हाणामारीत झाले. आदित्य पवारने आपल्या साथीदारांना ललकारत यांना मारून टाका असे आदेश दिले.

**विटांनी केला थरारक पाठलाग...**

जिवाच्या भीतीने पवन आणि मेघशाम यांनी मैदानातून पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, संख्येने जास्त असलेल्या १६ जणांच्या टोळीने त्यांचा पाठलाग केला. कारागृहाच्या आवारात पडलेल्या विटा उचलून या टोळीने दोघांवरही बेदम हल्ला चढवला. या हल्ल्यात पवन साळुंखे आणि मेघशाम ऊर्फ मोठ्या जाधव हे दोघेही गंभीर जखमी झाले आहेत. अचानक झालेल्या या राड्यामुळे कारागृहात एकच गोंधळ उडाला. सुरक्षा रक्षकांनी मध्यस्थी करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

या घटनेनंतर सांगली शहर पोलिसांनी तातडीने दखल घेतली असून, हल्लेखोर १६ जणांवर गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. कारागृहासारख्या सुरक्षित ठिकाणी अशा प्रकारे टोळीयुद्ध भडकल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

## पोलिसांनी स्पा सेंटरमध्ये 'ग्राहक' पाठवला ; पुण्यात सिनेस्टाईल कारवाई

**दि.२८, पुणे :** पुण्यातल्या कोरेगाव पार्क परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. वरून अगदी साधंसुधं दिसणारं स्पा सेंटर, पण आत मात्र पूर्ण वेगळाच धंदा सुरू असल्याचं पोलिसांच्या कारवाईत उघड झालं. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. ढोले पाटील रोडवरील 'क्लिओ स्पा' या नावाने चालणाऱ्या या ठिकाणाबद्दल काही दिवसांपासून संशय व्यक्त केला जात होता. स्थानिकांमध्ये इथे काहीतरी बिनसलंय अशी चर्चा सुरू होती. अखेर ही माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली आणि त्यांनी खात्री करण्यासाठी सापळा रचण्याचा निर्णय घेतला.

यासाठी पोलिसांनी बनावट ग्राहक तयार करून त्याला स्पामध्ये पाठवलं. आत गेल्यानंतर त्याने पाहिलेलं चित्र वेगळंच होतं. स्पा सेवांच्या आड अनैतिक प्रकार सुरू असल्याचं स्पष्ट झालं. त्यानंतर ठरल्याप्रमाणे सिग्नल मिळताच पोलिसांनी तात्काळ धाड टाकली. अचानक पोलीस आत शिरताच तिथे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या कारवाईत दोन महिलांना तिथून बाहेर काढून त्यांची सुटका करण्यात आली. त्याचबरोबर प्रीती उर्फ त्रिप्तिका नायर (वय २१) हिला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे.

या संपूर्ण कारवाईचं नेतृत्व पोलीस निरीक्षक ढगन कापसे यांनी केलं. व्यवस्थित नियोजन करून ही कारवाई करण्यात आली होती, त्यामुळे संशयितांना पळून जाण्याची संधी मिळाली नाही. या प्रकरणी कोरेगाव पार्क पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायद्यांतर्गत पुढील तपास सुरू आहे.




## आकड्यांपलीकडे काय मिळाले?

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे २५ मार्च २०२६ रोजी सूप वाजले. अर्थसंकल्पातून सामान्य जनतेच्या पदरी काय पडले याची नोंद या राज्याचे सुजाण नागरिक म्हणून आपल्याकडे असायला हवी. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेला २०२६-२७चा राज्य अर्थसंकल्प हा ७,६९,३५६ कोटी रुपयांच्या आकाराचा आहे. सकल राज्य उत्पन्न (जीएसडीपी) सुमारे ५१ लाख कोटींपासून ५४ लाख कोटींपर्यंत वाढण्याचा अंदाज, महसुली उत्पन्न ६,१६,००० कोटी, महसुली खर्च ६,५६,००० कोटी आणि महसुली तूट ४०,५५२ कोटी इतकी दाखवणारा हा अर्थसंकल्प 'विकसित महाराष्ट्र २०४७' च्या महत्त्वाकांक्षी स्वप्नावर आधारित आहे.

पात्र शेतकऱ्यांना दोन लाखांपर्यंत कृषी पीक कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजना अधिवेशनात जाहीर करण्यात आली. त्याचप्रमाणे नियमितपणे पीककर्जाचा हप्ता फेडणाऱ्या शेतकऱ्यांना अतिरिक्त ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान ही बाब दिलासादायक आहे. ७.५ एचपी पंपधारक शेतकऱ्यांच्या वीजबिलांवर दोन हजार कोटींची माफी, एआय-आधारित कृषी सल्ला यामुळे उत्पादन खर्च कमी होण्याची आशा निर्माण झाली आहे. ग्रामीण रस्ते, पाणीपुरवठा आणि आरोग्यासाठी ३० हजार कोटी, सोलर पंप, इलेक्ट्रॉनिक वाहनांवरील अनुदान आणि शिष्यवृत्ती-डिजिटल क्लासरूम यांसारख्या योजनांमुळे सामान्य कुटुंबांना काही प्रमाणात आधार मिळेल. मात्र, घोषणांमागील वास्तव वेगळे आहे. शेतकरी कर्जमाफीची 'पात्रता' निश्चित करताना कोणते निकष लावले जातील, हे स्पष्ट नाही. छोटे शेतकरी, भाड्याने जमीन कसणारी कुळे आणि आदिवासी शेतकरी यांना लाभ मिळेल की नाही, याची शंका कायम आहे. तेलंगणमध्ये कुळालाही कर्जमाफी मिळते, त्यामुळे तिथे शेतकरी आत्महत्या महाराष्ट्राच्या तुलनेत कमी आहेत.

महिलांसाठी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेची निरंतरता मिळाली; पण निवडणूकपूर्व २,१०० रुपयांपर्यंत वाढीचे आश्वासन या अर्थसंकल्पातही पूर्ण झाले नाही. २५ लाख महिलांना 'लखपती दीदी' बनवण्याचे उद्दिष्ट आणि ग्रामीण पशुधन उद्योगांवर विशेष भर दिला गेला आहे. उमेद मॉलचा १३ जिल्ह्यांत विस्तार, एकल महिला धोरणासाठी सर्वेक्षण आणि ग्रामीण भागातील महिलांसाठी विशेष पशुधन योजना यामुळे महिला अर्थव्यवस्थेत अधिक सहभाग वाढेल, अशी आशा निर्माण झाली आहे. तथापि, या योजनांचा थेट लाभ सामान्य महिलांपर्यंत कितपत पोहोचेल, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ग्रामीण विकास आणि पायाभूत सुविधांवरही अर्थसंकल्पाने लक्ष केंद्रित केले आहे. मुंबई मेट्रो विस्तार, उपनगरीय रेल्वे आणि रस्त्यांसाठी २० हजार कोटी, तर ग्रामीण रस्ते, पाणीपुरवठा आणि आरोग्यासाठी ३० हजार कोटी. यामध्ये १० हजार कोटी ग्रामीण आरोग्यासाठी तरतूद करण्यात आली आहे. गडचिरोली 'स्टील हब'मधून ७० हजारपेक्षा अधिक रोजगार आणि बांबू उद्योगातून ५ लाख रोजगार निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

हे प्रयत्न ग्रामीण-शहरी समतोल साधण्याच्या दिशेने सकारात्मक वाटतात; पण येथेही वास्तव वेगळे आहे. मुंबई, पुणे आणि नाशिकसारख्या शहरी केंद्रांवर विकासाची अधिकाधिक गुंतवणूक होत असताना विदर्भ, मराठवाडा आणि कोकणला समान वाटा मिळेल का, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. शिक्षण, आरोग्य आणि पर्यावरण क्षेत्रातही काही महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. शिष्यवृत्ती, स्मार्ट शाळा आणि डिजिटल क्लासरूम, डिजिटल हेल्थ प्रोग्राम, मेडिसिटी, सोलर पंप, इलेक्ट्रिक वाहन सबसिडी आणि पाच कोटी झाडे लावण्याची योजना यामुळे भविष्यकाळातील गुंतवणूक दिसते. डिजिटल उपकरणे आणि तंत्रज्ञान ग्रामीण व आदिवासी भागांपर्यंत पोहोचले तर फायदा होईल. मात्र येथेही व्यावहारिक अडचणी आहेत.

आर्थिक सर्वेक्षणानुसार राज्यात कृषी क्षेत्रात पाच टक्क्यांची घट नोंदवली गेली आहे. ही घट मुख्यतः कोरडवाहू विदर्भ-मराठवाड्यातील शेतीची आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी ब्यूरो अर्थात एनसीआरबीच्या आकडेवारीनुसार महाराष्ट्र शेतकरी आत्महत्यांमध्ये अग्रेसर राहिला आहे. विदर्भात सर्वाधिक आणि मराठवाड्यात दुसऱ्या क्रमांकावर आत्महत्या होतात. कर्ज समायोजन न झाल्याने कर्त्या पुरुषाच्या आत्महत्येनंतर महिलांवर आर्थिक, सामाजिक आणि मानसिक ताण वाढतो. लहान शेतकरी शेती विकू लागले आहेत. २७०० ओसाड गावांपैकी २३०० विदर्भातील आहेत. या पार्श्वभूमीवर कर्जमाफी हे केवळ तात्पुरते औषध ठरू शकते.

**- तुषार गायकवाड**

# भारत आखाती संघर्षाच्या नेमक्या कुठल्या ढगाआड लपला गेलाय...?




**रविवार विशेष !**

...इराणला आपल्या अटींवर नमवण्यात पुरते अपयशी ठरलेले अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प सध्या प्रचंड अस्वस्थ आहेत. त्यातूनच महिनाभरापूर्वी इराणला धडा शिकवण्याची भाषा करणारे ट्रम्प आता ट्रेड डील आणि शांतीवार्तेवर घसरले आहेत. अमेरिकेने इराणसोबत वाटाघाटीची बोलणी सुरू केल्याचे म्हणत ट्रम्प यांनी जाहीर केलेला ५ दिवसांचा युद्धविराम शुक्रवारी संपला. हा युद्धविराम संपत असतानाच इराणने अमेरिकेची शांतीवार्ता देखील धुडकावून लावली आहे. अमेरिकेने आमच्या जमिनीवर पाऊल ठेवून दाखवावे, मागच्या २० वर्षापासून आम्ही याच क्षणाची वाट बघतोय.

अशी चिथावणी देत इराणच्या लष्कराने १० लाख सैन्याची जमवाजमव सुरू केल्याचे समजते. अशा स्थितीतही डोनाल्ड ट्रम्प चिडून इराणवर पुन्हा तेवढ्याच तीव्रतेने बॉम्ब हल्ले करण्याची शक्यता कमी आहे. या सर्व वाटाघाटींच्या बोलणीत तुर्की आणि चक्क पाकिस्तान या दोन देशांचा प्रामुख्याने उल्लेख होतोय. हा उल्लेख होत असताना भारत आखाती संघर्षाच्या नेमक्या कुठल्या ढगाआड लपला गेलाय, असा प्रश्न विश्वगुरूंच्या पाठीराख्यांना नक्कीच पडला असेल. भारत ज्या देशाला दहशतवादाचा केंद्रबिंदू म्हणून जागतिक पटलावर हिणवतो तोच देश आज दोन देशांमधील युद्ध थांबवण्यात शांतीदूताची भूमिका बजावतोय. हे पाहूनच कदाचित परवा भारताचे परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांना राग अनावर झाला असेल. नवी दिल्लीतील सर्वपक्षीय बैठकीत जयशंकर यांनी पाकिस्तानला दलाल देश असे संबोधले. जयशंकर यांच्या वक्तव्याला प्रत्युत्तर देताना तिळपापड झालेल्या पाकिस्तानने भारतावर 'असभ्यतेचा' आरोप केला. आजघडीला भारत आणि पाकिस्तानमधील राजनैतिक संबंध अशा टोकावर पोहोचले आहेत, जिथे शब्दांचे वारही गोळ्यांपेक्षा जास्त बोचतात. खरे तर पाकिस्तानवर इतक्या टोकाची टीका करण्याऐवजी भारताने आपली शांतता प्रस्थापित करण्याची ताकद दाखवून द्यायला हवी. परंतु सद्यस्थितीत डोनाल्ड ट्रम्पच्या इशाऱ्यावर नाचणारा भारत मागच्या काही वर्षांत आपली जुनी प्रतिमा गमावून बसल्याचे दिसत आहे. ऑपरेशन सिंदूरच्या वेळी भारताने अचूक हल्ले करत पाकिस्तानातील दहशतवादी अड्डे नष्ट केले. पाकच्या सैन्याचे हल्ले यशस्वीरित्या परतवून लावले, त्यांच्या घरात घुसून अनेक लढाऊ विमाने, एअर डिफेन्स सिस्टिम, अत्याधुनिक यंत्रणा, विमानतळ, रन वे उद्धवस्त केले. मात्र, या लढाईत भारताची अमूक तमूक विमाने पाडून आपलाच विजय झाल्याचे नरेटिव्ह सेट करण्यात पाकिस्तान कमालीचा यशस्वी ठरला होता. भारताने सादर केलेले पुरावेही या नरेटिव्हपुढे फिके पडले. भरीस भर ट्रम्पतात्यानेही हा संघर्ष आपणच ट्रेड डिलच्या जोरावर थांबवल्याच्या गमजा जागतिक व्यासपीठावर सतराशे साठ वेळा मारल्या. या संघर्षात अनेक विमाने पाडली गेली.

अणुयुद्धाचीही वेळ आली होती, ट्रम्प अशा बाता मारत असताना भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर वा संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यापैकी एकालाही ट्रम्प यांची वक्तव्ये निव्वळ थापा आहेत हे म्हणण्याचे धाडस दाखवता आले नाही. ना संसदेत ना बाहेर. भारत पाकिस्तानच्या संघर्षात चीनने पाकिस्तानला छुपी मदत केली होती. तर, तुर्की आणि अझरबैझानने जाहीर पाठिंबा दिला होता. परंतु, भारताने जगभरात शिष्टमंडळे पाठवूनही इस्रायल वगळता एकही देश या संघर्षात भारताच्या बाजूने उभा राहिला नाही. ना कुठल्या देशाने पाकिस्तानी दहशतवादाचा जाहीर निषेध केला. एवढे कमी की काय भारताच्या जाहीर विरोधानंतरही वर्ल्ड बँकेने मंजूर केलेला निधी हसत हसत पाकिस्तानच्या झोळीत टाकला. भारताच्या परराष्ट्र धोरणाला बसलेला हा मोठा धक्का होता. पाक लष्करप्रमुख आसिफ मुनरला डिनरला बोलावून मांडीवर बसवणे, पाकिस्तानी पंतप्रधान शहाबाज शरीफला कडेवर उचलून घेणे हा ट्रम्पनीतीचा भाग असला, तरी भारताची कमकुवत भूमिकाही त्यासाठी तितकी कारणीभूत होती. आखाती देशा सौदी अरेबिया, इराण आणि इस्रायल हे तीन ध्रुव मानले जातात. कित्येक दशके भारताने कुणाचीही बाजू न घेता सर्वांशी समान राजकीय संबंध ठेवले होते. परंतु मोदींनी उघडपणे या भूमिकेला छेद देत आपल्या पायावर धोंडा पाडून घेतला. इराण कधीकाळी भारताला रुपयामध्ये स्वस्त दरात कच्चे तेल विकायचा. भारत-पाक संघर्षावेळी उघडपणे भारताची बाजू घ्यायचा. परंतु, अमेरिकेच्या दबावाने भारताने इराणशी असलेले कैक दशकांचे जुने व्यापारी आणि सांस्कृतिक संबंध तोडले. इराणमधील गुंतवणुकीवरही पाणी सोडले. इस्रायल, अमेरिकेच्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्या मृत्यूनंतर भारताने निषेधाचा एक चकार शब्दही उच्चारला नाही. उलट सौदी, कुवेतमधील हल्ल्यानंतर तेलसाठे आणि मानवतेवरील हल्ले चुकीचे आहेत म्हणत अमेरिका आणि इस्रायलची तळी उचलून धरली. याचा काय व्हायचा तोच परिणाम झाला. याच काळात पाकिस्तानने त्यांच्या संसदेत खामेनेई यांना श्रद्धांजली वाहिली. पाठोपाठ ईदच्या शुभेच्छाही दिल्या. या संघर्षात इरा इराण अमेरिकेवर भारी पडत असल्याचे दिसून आल्यानंतर आणि देशासमोर तेल संकट उभे राहिल्यानंतर भारताला इराणशी संपर्क साधण्याचे सुचले. सुदैवाने इराणने त्याला सकारात्मक प्रतिसाद दिल्यामुळे भारतावरील तेल संकट टळलेले आहे. आपल्या तंबूतील पाकला पुढे करून इराणला वाटाघाटीत नामोहरम करण्याची ट्रम्प यांची योजना आहे. या योजनेला इराण भीक घालण्याची शक्यता नाही. परंतु, ट्रम्पनीतीमुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानचा प्रभाव वाढत आहे, तर भारतीय परराष्ट्र धोरणाच्या बैलाला ढोल, एवढेच म्हणावे लागेल.


# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक : डॉ नागनाथ कोत्तापल्ले

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. चार वर्षापूर्वी ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते.

मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोतापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बीए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या



दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर आपल्यातून निघून गेले. त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## फोटो सेशन

फोटो सेशन करता
घेई काळजी किती
कोण उभा शेजारी
सतत वाटते भिती

सार्वजनिकउपक्रम
कैक आगंतुक येती
खेटूनबसून शेजारी
विविध पोझेस देती

हो नको म्हणायाचे
नसतेआपल्या हाती
ओळख नसता जरा
जोडतेकुणीही नाती

तोंडी ओळखे काही
चाले खोगीर भरती
फिरू लागतो फोटो
पोष्टस् मिडीयावरती

गुन्हेगार आहे कळते
गर्दीतली एक व्यक्ती
व्यक्त करतात संशय
आम्हासबसवे तख्ती

गुन्हेगारांशी संबंधीत
अकारण कशी सक्ती
बनवून टाका सोबती
लावतात संपूर्णशक्ती

प्रतिमा मलिन करायं
सापडली सोपी युक्ती
आयुष्यभराचे कर्तृत्व
कर्मयोगास देई मुक्ती

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# शेताच्या बांधाची ओळख हरवत चाललेलं नातं जपण्याची गरज!

आजचा विद्यार्थी मोबाईल, डिजिटल जगात गुंतून गेलाय हे सत्य नाकारता येत नसतानाच तो मात्र मातीपासून, निसर्गापासून आणि शेतीपासून दूर जात आहे, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. जी माती आपल्याला अन्न देते, जीवन देते, त्याच मातीशी असलेलं नातं आज तुटत चाललं आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेताच्या बांधावर नेऊन शेतीचा अनुभव देण्याचा संस्कार व्हॅली इंटरनॅशनल स्कूलचा उपक्रम खरोखरच दिलासा देणारा आहे, आशेचा किरण दाखवणारा आहे.

एके काळी शाळा म्हणजे केवळ पुस्तकांतील ज्ञान देणाऱ्या चार भिंती नव्हेत, तर जीवनाचे धडे देणारी जागा होती. जिल्हा परिषद शाळांना 'शेतकी शाळा' म्हणूनही ओळखले जायचं नव्हे तसे शाळांवर फलक लावलेले असायचे. विद्यार्थ्यांच्या हातात माती लागायची, त्यांनी पेरलेलं बीज उगवतांना पाहण्याचा आनंद मिळायचा. त्या अनुभवातून विद्यार्थ्याला शेतीबद्दल प्रेम, जिव्हाळा आणि आदर निर्माण व्हायचा. आज मात्र ही सगळी परंपरा हरवत चालली आहे.

कोकणासारख्या निसर्गसंपन्न भागातही शेती



ओस पडताना दिसते. अनेक शेतजमिनी पडिक राहताहेत, नवीन पिढी शेतीकडे वळत नाही. उत्तम शेती, दुय्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही म्हण आता केवळ आठवणीपूर्ती उरली आहे. आजच्या काळात नोकरीला प्राधान्य मिळत गेलं आणि शेती मागे पडली, हे वास्तव आहे. मात्र, शेतीशिवाय जीवन शक्य नाही, ही जाणीव आपण विसरत चाललो आहोत.

शेती ही केवळ व्यवसाय नाही, ती संस्कृती आहे, जीवनपद्धती आहे, आणि निसर्गाशी जोडणारा एक जिवंत दुवा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच शेतीची ओळख करून देणे ही काळाची गरज आहे. शालेय अभ्यासक्रमात शेतीचा समावेश करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेताच्या बांधावर नेण्याची, मातीशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

जेव्हा एखादा विद्यार्थी स्वतःच्या हाताने बी पेरेल, रोप वाढताना पाहील तेव्हा त्याच्या मनात केवळ ज्ञान नाही, तर संवेदनशीलता आणि कृतज्ञता निर्माण होईल. तो अन्नाचा आदर करायला शिकेल, शेतकऱ्याच्या कष्टांची जाणीव त्याला होईल. हे शिक्षण कोणत्याही पुस्तकातून मिळू शकत नाही ˘ ते फक्त अनुभवातूनच येते.

आज गरज आहे ती अभ्यास सहलींच्या माध्यमातून विद्यार्थ्याला प्रत्यक्ष बांधावर नेऊन शिक्षण आणि शेती यांच्यातील तुटलेला दुवा पुन्हा जोडण्याची. संस्कार व्हॅली इंटरनॅशनल स्कूलसारख्या उपक्रमांमुळे ही आशा पुन्हा जागी होते. अशा प्रयत्नांतूनच भविष्यातील पिढी मातीशी जोडली जाईल, शेतीकडे नव्या दृष्टीने पाहील आणि कदाचित पुन्हा एकदा उत्तम शेती या विचाराला सन्मान मिळेल.

शेताच्या बांधावर उभं राहून मातीचा सुगंध अनुभवणारी पिढी घडवणं ˘ हाच आपल्या भविष्याचा खरा पाया आहे.

**– विश्वनाथ पंडित, ठाणे**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## एन.जी. वाघमोडे यांना राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी (नांदेड) :** व्यसनमुक्ती क्षेत्रात समाज परिवर्तन आणि साहित्य क्षेत्राच्या माध्यमातून उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल नांदेड जिल्ह्यातील बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील निवृत्त मुख्याध्यापक तथा जेष्ठ पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते निवृत्ती गंगाराम वाघमोडे यांना महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या वतीने देण्यात येणारा हा पुरस्कार दरवर्षी व्यसनमुक्ती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना दिला जातो. २०२३-२४ वर्षासाठी एन.जी.वाघमोडे यांची निवड करण्यात आली. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात महाराष्ट्राचे सामाजिक न्याय मंत्री ना.संजय शिरसाठ आणि प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.यावेळी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, डॉ.हर्षदीप कांबळे, दीपा मुधोळ मुंडे, डॉ.भारत कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

समाज प्रबोधनाच्या माध्यमातून ते समाजात व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडाबंदी, पर्यावरण, संरक्षण, सेंद्रिय शेती, स्त्रीभ्रूण हत्या प्रतिबंध आदी विषयांवर प्रभावी जनजागृती करत आहेत. पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त करत एन.जी.वाघमोडे यांनी महाराष्ट्र शासनाचे आभार मानले आणि व्यसनमुक्तीचा संदेश अधिक व्यापकपणे पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला.

## श्रीराम दरबारात भक्तिमय वातावरणात रामनवमी साजरी

### महसूलमंत्री बावनकुळे व आमदार तुमाने यांची उपस्थिती



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** देहेगाव रंगारी-सब्बल नाला परिसरातील प्रसिद्ध श्री राम दरबार मंदिरात रामनवमीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. आयोजित भव्य शोभायात्रेत हजारो भाविक सहभागी झाले होते. या सोहळ्याला राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार कृपाल तुमाने यांच्यासह भाजप जिल्हा उपाध्यक्ष किशोर चौधरी, शिवसेना नेते उत्तम कापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी श्रीराम दरबार मंदिराचे संस्थापक बबलू ठाकूर यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत व सत्कार केला.चनकापूर व देहेगाव रंगारी येथून भव्य शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या शोभायात्रेत घोडे, उंट, बग्गी, विविध झांक्या, भजन मंडळ, बँड, डीजे साउंड, आदी सामील करण्यात आले होते शिवाय श्रीराम दरबार मंदिराची आकर्षक सजावट करण्यात आली होती. दोन्ही शोभायात्रांचे श्रीराम दरबारात आगमन झाल्यानंतर मध्य प्रदेशातील श्री माँ अंबिका जागरण ग्रुपचा जगराता कार्यक्रम पार पडला. या धार्मिक वातावरणात परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी केली होती भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर पार्किंगची चोख व्यवस्था करण्यात आली होती कार्यक्रमाच्या शेवटी जवळपास २० हजार भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## युद्ध थांबवण्यासाठी ट्रम्पनी इराणसमोर ठेवल्या १५ अटी





**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२८, तेल अविव :** इराणविरोधात अमेरिका आणि इस्त्राइलने पुकारलेल्या युद्धाला आता महिना होत आला आहे. इराणविरोधात मध्यपूर्वेतील अन्य मुस्लीम देशही एकवटले आहेत. तरीही इराण मागे हटण्याची चिन्हे दिसत नाहीत. या युद्धामुळे जगातील अनेक देशांमध्ये इंधन टंचाई निर्माण झाली आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर ताण आला आहे. दरम्यान आता इस्त्रायलच्या 'चॅनल १२' च्या वृत्तानुसार, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाने इराणसमोर सुरू असलेला संघर्ष थांबवण्यासाठी १५ कलमी प्रस्ताव ठेवला आहे. एका अमेरिकी अधिकाऱ्याच्या हवाल्याने ही माहिती दिली असून, वॉशिंग्टनने या चर्चांची माहिती इस्त्रायललाही दिल्याचे सांगितले जात आहे.

मात्र, इस्त्रायलला चिंता आहे की, ट्रम्प प्रशासन या अटी अनिवार्य करण्याऐवजी फ्रेमवर्क करार करण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. व्हाईट हाऊसचे विशेष दूत स्टीव्ह विटकॉफ आणि ट्रम्प यांचे निकटवर्तीय जॅरेड कुशनर यांनी एक यंत्रणा तयार केल्याचे सांगितले जाते. यामध्ये एक महिन्याच्या युद्धविरामाची घोषणा करून त्या कालावधीत १५ कलमी प्रस्तावावर चर्चा करण्याचा विचार आहे.

**इराणसमोर अमेरिकेने ठेवलेल्या प्रमुख अटी :**

* इराणने आपली अणु क्षमता पूर्णपणे नष्ट करावी.
* अण्वस्त्र कार्यक्रम न राबवण्याची कायमची हमी द्यावी.
* युरेनियम समृद्धीकरण पूर्णपणे थांबवावे.
* ६०% समृद्ध केलेले सुमारे ४५० किलो युरेनियम आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेकडे (आयएईए) सुपूर्द करावे.
* नतांझ, इस्फहान आणि फोर्डो येथील अणु प्रकल्प बंद करावेत.
* आयएईए ला पूर्ण तपासणी व देखरेखीचा अधिकार द्यावा.
* प्रादेशिक 'प्रॉक्स' धोरणाचा त्याग करावा.
* प्रॉक्सी गटांना निधी, शस्त्रसाठा आणि मदत थांबवावी.
* होर्मूज सामुद्रधुनी खुली ठेवावी.
* क्षेपणास्त्रांवर मर्यादा घालावी.
* भविष्यातील क्षेपणास्त्र वापर फक्त स्वसंरक्षणापुरता मर्यादित ठेवावा.

## मुंबई येथे महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाची यशस्वी बैठक - आक्रोश मोर्चा अटळ

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२८, नागपूर :** महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य कार्यालय, मुंबई येथे एक महत्त्वपूर्ण त्रिपक्षीय बैठक पार पडली. या बैठकीत वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

गेल्या ४ ते ५ महिन्यांपासून महाराष्ट्र राज्यातील क्रिस्टल एजन्सी व स्मार्ट एजन्सीमार्फत कार्यरत कामगारांचे वेतन प्रलंबित असल्याचा गंभीर मुद्दा संघटनेने मांडला. या संदर्भात संघटनेतर्फे मुख्य नियोक्ता व संबंधित व्यवस्थापनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. संकेत कानडे (कामगार उपायुक्त, ग्राम ीण) यांच्या मार्गदर्शनाखाली व सौ. साकोरे (सहाय्यक कामगार आयुक्त) यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. बैठकी दरम्यान, कंत्राटदारांकडून वेतन न दिल्यास मुख्य नियोक्ता म्हणून महावितरणने कामगारांना वेतन द्यावे, अशी ठाम मागणी संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात व सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी केली.

यावेळी तांत्रिक कारणांमुळे वेतन देण्यात विलंब झाल्याचे सांगण्यात आले असून, लवकरच महावितरण प्रशासन, कंत्राटदार एजन्सी व संघटना यांच्यात पुन्हा त्रिपक्षीय बैठक घेऊन कायम स्वरूपी तोडगा काढण्याचे आश्वासन देण्यात आले.

या बैठकीस महावितरणकडून ललित गायकवाड, देवडीया तसेच संघटनेकडून अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, उपाध्यक्ष कमाल खान सुमित कांबळे व संबंधित एजन्सींचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तसेच, दि.१६ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या आक्रोश मोर्चाबाबत मुख्यमंत्री, कामगार मंत्री, व्यवस्थापकीय संचालक (महावितरण, महापारेषण, महानिर्मिती) व कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांना अधिकृत नोटीस देण्यात आल्याची माहिती देण्यात आली.



**प्रमुख मागण्या :-**

हरियाणा पॅटर्ननुसार कंत्राटदार-विरहित रोजगार व्यवस्था लागू करावी, राज्य सरकारने ठोस रोजगार धोरण जाहीर करून कामगारांना नोकरीत स्थैर्य द्यावे, क्रिस्टल व स्मार्ट एजन्सी अंतर्गत कामगारांचे थकीत वेतन तात्काळ अदा करावे, सेवा अटी व कायदेशीर सुविधा त्वरित लागू कराव्यात आदी मागण्यांवर कामगार आयुक्त कार्यालयाने या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेण्याचे आश्वासन दिले असून, प्रश्न निकाली न निघाल्यास संघटनेतर्फे तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला.

महाराष्ट्रातील वीज उद्योगातील कंत्राटी कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटना सातत्याने लढा देत आहे.

या पार्श्वभूमीवर येत्या दि. १६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथे आयोजित आक्रोश मोर्चा अटळ असून तो मोठ्या प्रमाणावर पार पडणार असल्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ सर्व कामगारांना आवाहन करीत आहे की, या आक्रोश मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी होऊन आपल्या हक्कांसाठी एकजूट दाखवावी असे आवाहन केले आहे.

## तंत्रज्ञानाद्वारे जनसेवेचा नवा आदर्श; ठाणे पोलीस आयुक्तालयाचा गौरवपूर्ण प्रवास

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२८, ठाणे :** महाराष्ट्र शासनाच्या '१५० दिवसांचा ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम' अंतर्गत ठाणे पोलीस आयुक्तालयाने राज्यातील १२ आयुक्तालयांच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावून प्रशासकीय उत्कृष्टतेचा नवा मापदंड प्रस्थापित केला आहे. २८ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे व त्यांच्या चमूला या यशाबद्दल प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. हे यश केवळ प्रशासकीय सुधारणा नसून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य नागरिकांना पारदर्शक आणि जलद सेवा देण्याच्या वचनबद्धतेचे फळ आहे.

ठाणे पोलीस आयुक्तालयाने आपल्या कार्यप्रणालीत आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी सात मुख्य घटकांवर लक्ष केंद्रित केले होते. यामध्ये आयुक्तालयाचे अधिकृत संकेतस्थळ आता अधिक सुलभ आणि सुरक्षित करण्यात आले असून, ते WCAG २.१ अअ मानकांनुसार अपंग व्यक्तींसाठीही वापरण्यायोग्य बनवले आहे. प्रशासकीय कामात वेग आणण्यासाठी शजषषळलश प्रणालीचा १००% अवलंब करण्यात आला असून, तब्बल २,९७,६५२ फाईल्सचा निपटारा डिजीटल पद्धतीने करण्यात आला आहे, ज्याची टक्केवारी ९८.६५% इतकी प्रभावी आहे. ठाणे पोलिस आयुक्तालय ई-ऑफिस प्रणालीच्या वापरत राज्यात प्रथम क्रमांकावर आहे. नागरिकाभिमुख सेवांमध्ये 'आपले सरकार' पोर्टलद्वारे प्राप्त झालेल्या २,१९६ अर्जांपैकी २,०९३ अर्ज निकाली काढून ९५.३५% यशाचा दर गाठला आहे. तसेच पी.जी. पोर्टलवर ९९% आणि सिटीझन पोर्टलवर ९९.६८% तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे. महिला आणि नागरिकांच्या सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या 'निर्भय ठाणे' व्हॉट्सॲप चॅटबॉट (९३२६५२०५२५) ला प्रचंड प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत १,९५५ हून अधिक नागरिकांनी १३,८५० वेळा या प्रणालीशी संवाद साधला आहे. यामध्ये ऑनलाईन तक्रारी (३५४), पोलीस ठाणे माहिती (३४७) आणि ट्रॅफिक अपडेट्स (२९१) यांसारख्या सेवांचा समावेश आहे. गुन्हे नियंत्रण आणि तपासात कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि ऋखड (भौगोलिक माहिती प्रणाली) चा वापर हे ठाणे पोलिसांच्या यशाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले आहे.

'त्रिनेत्र' ॲपच्या माध्यमातून २४,३०० हून अधिक गुन्हेगारांची माहिती संकलित करण्यात आली असून, ऋछ (चेहरा ओळख प्रणाली) द्वारे आरोपींची ओळख पटवणे सोपे झाले आहे.

ITMS प्रणालीद्वारे ६९,२६४ वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करून ३६,३८,०००/- रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, आपले ठाणे सुरक्षित ठाणे आणि आपले ठाणे निर्भय ठाणे या GIS आधारित दोन्ही उपक्रमामध्ये गुन्हेगारांच्या घरांचे मॅपिंग झाल्यामुळे व तेथे पोलिस कर्मचाऱ्यांनी नियमितपणे भेटी दिल्यामुळे गुन्हेगारांवर वचक निर्माण झाला असून, २०२४ च्या तुलनेत २०२५ मध्ये गुन्ह्यांच्या प्रमाणात १२% घट नोंदवण्यात आली आहे. अंतर्गत प्रशासनातही आयुक्तालयाने पारदर्शकता आणली आहे. पोलीस कल्याण निधीच्या १३ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या असून, लाभार्थ्यांना मदतीची रक्कम थेट बँक खात्यात जमा केली जाते. कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी पोलीस वेलनेस सेंटर आणि सायबर गुन्हे पिडीतांसाठी सायबर समुपदेशन केंद्र (ज्याद्वारे ४५ पिडीतांचे समुपदेशन झाले) कार्यान्वित करण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांनी या यशाबद्दल सर्व अधिकारी आणि अंमलदारांचे अभिनंदन करतानाच, भविष्यातही अशाच समर्पित भावनेने कार्य करून नागरिकांचा विश्वास संपादन करण्याचे आवाहन केले आहे.

## पळसपूर येथे मंगळवारपासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

### श्री भगवती देवी यात्रेनिमित्त भव्य क्रिकेट स्पर्धा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२८, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील पळसपूर परिसरातील प्रसिद्ध असलेल्या ग्रामदैवत श्री. भगवती देवी मातेच्या यात्रेनिमित्त ग्रामस्थांच्या व श्री भगवती देवी क्रिकेट क्लब यांच्या वतीने टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

पळसपूर प्रीमियर लीग २०२६, भगवतीदेवी चषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन मंगळवार, दि. ३१ मार्च ते ३ एप्रिल दरम्यान सकाळी १० वाजता पळसपूर येथील नवीन ग्राऊंडवर केले आहे. अशी माहिती उद्योजक संजयशेठ आहेर व पळसपूर ग्रामस्थांनी दिली. या स्पर्धेचे हे १५ वे वर्ष आहे. तसेच पळसपूर हे गाव परिसरात पहिल्यापासूनच क्रिकेटप्रेमी म्हणून ओळखले जाते. पळसपूर या ग्रामीण भागात पूर्वीपासूनच क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

या स्पर्धेतील प्रथम विजेत्या संघास भाऊसाहेब नानाभाऊ रेपाळे (आप्पा) यांच्या वतीने २१ हजार रुपये, उपविजेत्या संघास द्वितीय पारितोषिक जालिंदरशेठ आहेर व उद्योजक संजयशेठ आहेर यांच्या वतीने १५ हजार रुपये, तृतीय पारितोषिक धनंजयशेठ निमसे यांच्या वतीने १२ हजार रुपयांचे बक्षीस देण्यात येणार आहे. त्याशिवाय उत्कृष्ट फलंदाज,मॅन ऑफ द मॅच, चौकार हॅटट्रिक, षटकार हॅटट्रिक, विकेट हॅटट्रिक, उत्कृष्ट गोलंदाज, क्षेत्ररक्षक, यष्टिरक्षक, मालिकावीर, अंतिम सामनावीर,पंच, समालोचक, स्मृती चिन्ह याशिवाय रोख रक्कम आणि ट्रॉफी अशी




बक्षीसांची लयलूट असणार आहे. समालोचक म्हणून तुषार शिंदे, मयुर शिंदे, गोकुळ आहेर व प्रवीण आहेर हे असणार आहेत.

या स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ गुरुवार, दि.०२ एप्रिल रोजी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत पळसपूर येथे करण्यात येणार आहे. या स्पर्धेत परिसरातील नामांकित बलाढ्य संघांचा सहभाग असणार आहे. यामध्ये जोगेश्वरी फायटर्स, तेजस्विनीताई अमोलभाऊ उगले प्रतिष्ठान पळसपूर,स्व. भाऊसाहेब दादा स्मृती ११, जयभवानी उद्योग समूह, भगवती वॉरियर्स हे संघ आपली ताकद आजमावणार आहेत. या क्रिकेट स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभागी होऊन क्रिकेटप्रेमींनी खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संजयशेठ आहेर व उद्योजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आयोजक श्री भगवती देवी क्रिकेट क्लब पळसपूर यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रा. डॉ. गोविंद चौधरी यांच्या 'एआय' आधारित फॉरेन्सिक ऑडिटिंग डिव्हाइसला भारत सरकारचे पेटंट

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२८, कुंडलवाडी :** डिजिटल युगात वाढणारे आर्थिक घोटाळे आणि सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. डॉ. गोविंद चौधरी (देव) यांनी एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. त्यांनी विकसित केलेल्या 'ऑटोमॅटिक फॉरेन्सिक ऑडिटिंग डिव्हाइस' (अींीरींळल ऋॲशपीळल अींवळींळपस ृशींळलश) या नाविन्यपूर्ण संशोधनाला भारत सरकारच्या बौद्धिक संपदा अधिकार अंतर्गत २० मार्च २०२६ रोजी अधिकृत पेटंट प्रदान केले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर केल्यामुळे डॉ.चौधरी यांचे हे उपकरण मानवी हस्तक्षेपाशिवाय आर्थिक व्यवहारांवर २४ तास लक्ष ठेवणार आहे. यामध्ये 'न्यूरल नेटवर्क' आधारित एआय इंजिनचा वापर करण्यात आला आहे. हे उपकरण संस्थेचे अकाऊंटिंग सॉफ्टवेअर आणि बाह्य बँकिंग गेटवे यांच्यामध्ये बसवले जाते. कोणताही व्यवहार पूर्ण होण्यापूर्वीच, हे यंत्र त्या व्यवहाराची पडताळणी करते. जर त्यामध्ये काही विसंगती किंवा घोटाळ्याचे संकेत मिळाले, तर हे यंत्र तात्काळ 'टॅम्पर प्रूफ' (फेरफार करता न येणारा) फॉरेन्सिक रिपोर्ट तयार करते. यामुळे बँका, ई-कॉमर्स कंपन्या आणि सरकारी संस्थांमधील संभाव्य आर्थिक फसवणूक होण्यापूर्वीच रोखता येणार आहे.१९७२ पासून कार्यरत असलेल्या पानसरे महाविद्यालयाच्या ५४ वर्षांच्या गौरवशाली इतिहासात, वाणिज्य विषयात पेटंट मिळवणारे डॉ. गोविंद चौधरी हे पहिलेच प्राध्यापक ठरले आहेत. वाणिज्य विषयातील सिद्धांतांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन त्यांनी हे 'सेल्फ-इवॉल्विंग' (स्वतःहून शिकणारे) सिस्टीम तयार केले आहे, जे काळानुसार नवीन प्रकारचे घोटाळेही शोधण्यास सक्षम आहे. या संशोधनाची नोंदणी ३ जानेवारी २०२६ रोजी करण्यात आली होती. दरम्यानच्या कालावधीत भारत सरकारने या संशोधनाची तांत्रिक क्षमता ओळखून २० मार्च रोजी यास मंजुरी दिली. हे संशोधन वाणिज्य क्षेत्रातील संशोधकांसाठी आणि विद्यार्थ्यांसाठी एक नवी दिशा देणारे ठरणार आहे.

या जागतिक दर्जाच्या यशाबद्दल हुतात्मा गोविंदराव पानसरे शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी आणि प्राचार्य डॉ. एम. बी. बेलखेडे, कार्यालयीन अधीक्षक राजेश्वर लापशेटवार यांच्यासह शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी डॉ. चौधरी यांचे कौतुक केले आहे.

# पडोली येथे 'आमदार चषक २०२६' भव्य कबड्डी स्पर्धेचा शुभारंभ

## चंद्रपूरच्या प्रतिभेला नवे पंख देण्याचा प्रयत्न - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२८, चंद्रपूर :** श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून चंद्रपूरच्या खेळाडूंना सक्षम व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य सुरू असल्याचे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. ग्रामीण भागातील असंख्य गुणी खेळाडूंमध्ये प्रचंड क्षमता असून, योग्य संधी आणि मार्गदर्शनाच्या अभावामुळे त्यांची प्रतिभा अनेकदा दडपली जाते. हाच विचार लक्षात घेऊन बॉडी बिल्डिंग, कबड्डी, कुस्ती, क्रिकेट, हँडबॉल यांसारख्या विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असून, या माध्यमातून चंद्रपूरच्या प्रतिभेला नवे पंख देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री माता महाकाली क्रीडा महोत्सवांतर्गत पडोली येथील खुटाळा येथे आमदार चषक २०२६ या पुरुष व महिला कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक २७ मार्च २०२६ रोजी रात्री ९ वाजता आ. किशोर जोरगेवार यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.



यावेळी विनोदी रील स्टार साहिल कडक यांची विशेष उपस्थिती लाभली. या प्रसंगी भारतीय जनता पार्टीचे महामंत्री रवी गुरुनुले, मनपा नगरसेविका आशा देशमुख, सायली येरणे, घुग्घूस नगर परिषदचे नगरसेवक आशिष मासिरकर, नकुल वासमवार, प्रविण सिंग, राकेश पिंपळकर, राशिद हुसेन, नितीन साळवे, दयानंद साखरकर, आशिष वाढई, रुपेश झाडे, दिनेश कोईचारे, प्रकाश तुमाने, साहिल चहारे, अजय काजवले, ऋषभ दुपारे, सुमित बेले, प्रलय मशखेतरी, जय मिश्रा, केशव वाघाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, या क्रीडा महोत्सवाचा उद्देश केवळ स्पर्धा घेणे नसून, चंद्रपूरमधील खेळाडूंना घडवणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे आणि त्यांना राज्य व राष्ट्रीय स्तरावर पोहोचवणे हा आहे.

या मंचाच्या माध्यमातून उद्याचे उत्कृष्ट खेळाडू घडावेत आणि आपल्या जिल्ह्याचा गौरव वाढवणारे प्रतिभावान युवक-युवती तयार व्हावेत, हा आमचा प्रयत्न आहे. क्रीडा ही केवळ शरीरसौष्ठव वाढवणारी गोष्ट नसून, ती जीवनाला दिशा देणारी शक्ती आहे. त्यामुळे अशा उपक्रमांद्वारे निरोगी, शिस्तबद्ध आणि आत्मविश्वासू समाज घडवण्याचा प्रयत्न होत आहे. खेळ आणि क्रीडा हे केवळ मनोरंजनाचे साधन नसून, ते जीवनाचा महत्त्वाचा भाग आहेत. क्रीडेमुळे शरीर सुदृढ राहते, मन प्रसन्न राहते आणि जीवनात शिस्त व आत्मविश्वास निर्माण होतो. कबड्डीसारख्या खेळामुळे संघभावना, धैर्य, निर्णयक्षमता आणि संघर्ष करण्याची ताकद विकसित होते. अशा स्पर्धांमुळे समाजात एकता, बंधुभाव आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते, असेही ते म्हणाले. सदर कबड्डी स्पर्धा तीन दिवस चालणार असून, यात १६ संघांनी सहभाग घेतला आहे. पुरुष गटात ५७ व ७० किलो वजन गट, तर महिला गटात ५५ किलो व खुल्या (ओपन) गटात स्पर्धा घेण्यात येत आहे.

### साहिल कडक यांची उपस्थिती ठरली आकर्षणाचे केंद्र

या कार्यक्रमाला विनोदी रील स्टार साहिल कडक यांची विशेष उपस्थिती लाभली.तरुणाईमध्ये विशेष लोकप्रिय असलेल्या साहिल कडक यांना पाहण्यासाठी गर्दी झाली होती. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला वेगळीच रंगत लाभली, युवकांमध्ये क्रीडाप्रती अधिक उत्साह आणि ऊर्जा निर्माण झाल्याचे दिसून आले. आयोजकांच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला.

# गोवरी येथे श्री प्रभू रामचंद्रजींच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा

**अक्षराज : चंद्रकात भोयार**

**दि.२७, राजुरा (चंद्रपूर) :** चैत्र शुद्ध नवमी अर्थात श्रीराम नवमीचे औचित्य साधून राजुरा तालुक्यातील गोवरी येथील महाबली हनुमान मंदिर परिसरात प्रभू रामचंद्रजींच्या मूर्तीचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. यावेळी मंदिरात विधीवत पूजा-अर्चा, होम-हवन आणि मंत्रोच्चाराने प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिस्थापना करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर 'जय श्रीराम'च्या घोषणांनी दुमदुमून गेला होता. भजन दिंडी आणि पालखीने गोवरी गावातील मुख्य रस्ते रामनामाचा जयघोषात गजबजून गेले. श्रीराम जन्मोत्सवाच्या निमित्याने गावातील या मंगलमयी सोहळ्याचे औचित्य साधून आमदार देवराव



भोंगळे यांचे हस्ते गावातील जावई आणि लेकींचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामांचे जीवन आपल्याला संयम, सेवा आणि सत्याच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देते. गोवरी येथील ग्रामस्थांनी ज्या एकजुटीने आणि श्रद्धेने हे भव्य मंदिर उभारून या मंदिरात श्री प्रभू रामचंद्रजींच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली. त्याबद्दल आदर्श मंडळ व गावकऱ्यांचे आमदार भोंगळे यांनी मनापासून कौतुक केले. याप्रसंगी माजी जि.प.सभापती सुनील उरकुडे, रील्सस्टार विलास झट्टे, जेष्ठ नागरिक सुधाकर पाचभाई, हरिश्चंद्र जुनघरी, नामदेव काळे, प्रभाकर उरकुडे, दिगांबर देवाळकर, महेश कोटगीरवार, विनोद वांढरे, भाजपा महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा पौर्णिमा उरकुडे, ग्राम पंचायत सदस्य शंकर बोढे, अविनाश उरकुडे, दिपक उरकुडे, रामदास देवाळकर, अभय उरकुडे, हर्षल वनकर, वैभव काळे, रोशन बोबडे यांचेसह आदर्श मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेचा राज्यात प्रथम क्रमांक; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र प्रदान

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, पनवेल :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या कार्यालयांचा प्रशस्तीपत्र प्रदान समारंभ आज उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात ई-गव्हर्नन्स सुधारणा तसेच सेवाकर्मी प्लस उपक्रमात पनवेल महानगर पालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत मानाचा बहुमान मिळविल्याबद्दल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पनवेल महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.



यावेळी माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल उपस्थित होते. राज्यातल्या एकूण २९ महानगरपालिकांनी या स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला होता. अनेक मोठ्या व अनुभवी महानगरपालिका स्पर्धेत असताना पनवेल महानगरपालिकेने आपला झेंडा फडकवला असून याबाबत पनवेल चे विशेष कौतुक होत आहे. आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या नेतृत्वात परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे व संगणक विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या टीमने अथक मेहनत करीत हा बहुमान पटकावला आहे. पनवेल महानगरपालिकेने यापूर्वीही १०० दिवसांचा प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमामध्ये चांगली कामगिरी बजावत तिसरा क्रमांक पटकावला होता.

### इ गव्हर्नन्स कार्यक्रम

१५० दिवसांच्या इ गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामधे महानगरपालिकेचे संकेतस्थळ वापरण्यास सुलभ, सुरक्षित, अद्ययावत असणे; महानगरपालिकेचे डॅश बोर्ड विकसित करणे; आपले सरकार अंतर्गत नागरिकांना विहित वेळेत सुलभतेने सेवा पुरवणे; कार्यालयात ई ऑफिस चा प्रभावी वापर करणे; व्हाट्सअप चाटबोट चा वापर करणे; एआय चा वापर करणे; जीआयएस चा वापर करणे अश्या घटकांचा समावेश होता.आयुक्त मंगेश चितळे यांनी आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यावर लगेचच कार्यालयात इ ऑफिस सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्याचप्रमाणे आयुक्तांच्या संकल्पनेतून विकसित करण्यात आलेल्या Panvel Connect App Ûmao नागरिकांना सुलभ सेवा प्रदान करता आल्या. याचा मोठ्या प्रमाणात फायदा या स्पर्धेसाठी झाला.

### सेवाकर्मी प्लस कार्यक्रम

कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबींच्या सुधारणांकरीता १५० दिवसांचा सेवाकर्मी कार्यक्रमामध्ये संपूर्ण राज्यातून २९ महानगर पालिकांचा सहभाग होता. या सर्व महानगर पालिकांमधून एकच क्रमांक काढण्यात आला असून तो पनवेल महानगरपालिकेने पटकाविला. सेवाविषयक प्रगतीचे मूल्यांकन करण्याकरिता 'सेवाविषयक बाबींच्या गुणांकनाचा सेवा कर्मी कार्यक्रमा'मध्ये आकृतिबंध मंजूर असणे, सेवाप्रवेश नियम मंजूर असणे, सेवाज्येष्ठता अद्ययावत करून प्रसिद्ध करणे, पदोन्नती पदांची स्थिती, सरळसेवा पदांची स्थिती, बिंदुनामवाली प्रमाणित असणे, अनुकंपा नियुक्त्या, iGOT रजिस्ट्रेशन व प्रशिक्षण, सेवापुस्तक अद्ययावत करणे अश्या नऊ मुद्द्यांवर आधारित मूल्यांकन झाले होते. यामध्ये १०० पैकी ९६ गुण घेऊन पनवेल महानगरपालिकेने बाजी मारली आहे.

> पनवेल महानगरपालिकेने मिळवलेले हे यश हे केवळ क्रमांकापुरते मर्यादित नसून प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि नागरिकाभिमुख सेवांचा परिणाम आहे. या यशामागे सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वय, परिश्रम आणि बांधिलकी आहे. भविष्यातही याच दिशेने अधिक नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून पनवेल महानगरपालिका राज्यात आदर्श ठरेल, असा मला विश्वास आहे.
>
> **- आयुक्त मंगेश चितळे**

तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांच्या दूरदृष्टीने त्यावेळी भरती प्रक्रिया राबविण्यात आली. त्याचा विशेष फायदा या स्पर्धेसाठी झाला. आयुक्त मंगेश चितळे यांनी आयुक्तपदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या पसेवाविषयक बाबी जसे की सेवाजेष्ठता यादी, आश्वासित प्रगती योजना राबविणे, पदोन्नती देणे व भरती प्रक्रिया पार पाडणे यास प्राधान्य दिले. अशा बाबींमुळे सेवाकर्मी स्पर्धेत फायदा झाला.सदर घटकांचे सादरीकरण दिनांक १० जानेवारी रोजी महानगरपालिकेने सादर केले होते.

या स्पर्धेचे मूल्यांकन क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) या राष्ट्रीय संस्थेने पारदर्शक पणे केले होते. आज पुरस्कार प्रशस्तीपत्र वितरण समारंभावेळी प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या कार्यालय प्रमुखांना कार्याचे सादरीकरण करण्याची संधी देण्यात आली होती.

यावेळी पनवेल महानगर पालिकेने केलेल्या सादरीकरणाची उपस्थितांनी प्रशंसा केली.तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांची प्रेरणा व आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे यांच्या नेतृत्वाखाली संगणक विभागप्रमुख वर्षा पालवे, दिशा टाक व कर्मचारी यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली.

# थोडक्यात

## शहापूरात भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन

**अक्षराज : सुनिल फर्डे**

**दि.२८, शहापूर (ठाणे) :** ठाणे जिल्हा असोसिएशनच्या मार्गदर्शनाखाली लोककल्याण सामाजिक संस्थेतर्फे भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे. ही स्पर्धा २, ३ आणि ०४ एप्रिल २०२६ दरम्यान सायंकाळी ७ वाजता पार पडणार आहे.

ही तीन दिवसीय कबड्डी स्पर्धा ठाणे जिल्ह्यातील कबड्डीप्रेमींसाठी मोठे आकर्षण ठरणार असून विविध संघ यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेसाठी विजेत्या संघांना आकर्षक रोख पारितोषिके व चषक देण्यात येणार आहेत. प्रथम पारितोषिक म्हणून २५,५५५ रुपये, द्वितीय पारितोषिक १५,५५५ रुपये देण्यात येणार असून इतर ही पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली आहे. स्पर्धेदरम्यान उत्कृष्ट खेळाडू, उत्कृष्ट चढाई आणि उत्कृष्ट पकड यांसाठी विशेष पुरस्कार देखील दिले जाणार आहेत. तसेच प्रेक्षकांसाठी 'लकी ड्रॉ'चे आयोजन करण्यात आले असून यात कुलर, मिक्सर आणि इस्त्री यांसारखी बक्षिसे जिंकण्याची संधी मिळणार आहे.

या स्पर्धेचे आयोजन सावंत मैदान, संत तुकाराम महाराज चौक, शहापूर (जि.ठाणे) येथे करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन रविंद्र लकडे यांच्या नेतृत्वाखाली होत असून स्थानिक मंडळांचा यामध्ये सहभाग आहे. या उपक्रमामुळे ठाणे जिल्ह्यात कबड्डी खेळाला चालना मिळण्यास मदत होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## खारघरमध्ये अनधिकृत आईस्क्रीम गाड्यांवर कारवाई




**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२८, पनवेल :** महानगरपालिका प्रभाग समिती 'अ' अंतर्गत अतिक्रमण विभागाच्या वतीने खारघर येथे नुकतीच अतिक्रमण विभागाच्या वतीने कारवाई करून हिरानंदानी येथील मार्जिनल स्पेस मोकळा करण्यात आला. तसेच अनधिकृत आईस्क्रीम - फालुदा विक्री करणाऱ्या ६ गाड्या जप्त करण्यात आल्या.

खारघर शहरात विविध ठिकाणी अनधिकृत आईस्क्रीम- फालुदा विक्री होत असल्याचे दिसून येत आल्याने आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या आईस्क्रीम-फालुदा विक्री करणाऱ्या गाड्यांवर अतिक्रमण विभागाच्या वतीने नुकतीच जप्तीची कारवाई करण्यात आली.

यामध्ये सेक्टर ७,१२,१८,१९ अशा विविध सेक्टर मध्ये अनधिकृत आईस्क्रीम - फालुदा विक्री करणाऱ्या ६ गाड्या जप्त करण्यात आल्या. याबरोबर हिरानंदानी सेक्टर १५ येथील फतुश शॉप समोर १५ स्टील स्टूल जप्त करण्यात आले. तसेच सेक्टर ७ हिरानंदानी येथे टेबल जप्त करण्यात आले. कारवाई दरम्यान माननीय अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी रुपाली माने, अधीक्षक जितेंद्र मढवी, १० सुरक्षा रक्षक, अतिक्रमण पथक उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने अशा प्रकारच्या अनधिकृत अतिक्रमणांवरती पुढेही कारवाई सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

## भोंदूबुवा अशोक खरात यांच्या निषेधार्थ वाशी येथे तीव्र निषेध सभा



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२७, वाशी (नवी मुंबई) :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबई यांच्या तर्फे नाशिक येथील भोंदूबुवा अशोक खरात याच्या विरोधात पुकारलेल्या निषेध सभेला वाशी येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ही निषेध सभा दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६:३० ते ८:३० या वेळेत वाशी रेल्वे स्टेशन बाहेर आयोजित करण्यात आली होती.

या सभेमध्ये उपस्थित विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी भोंदूबुवा अशोक खरात याच्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. याला अधिकाधिक शिक्षा देण्यात यावी, इतकेच नव्हे तर फाशीची शिक्षा व्हावी, अशी तीव्र भावना व्यक्त करण्यात आली. तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायदा अधिक सक्षमपणे राबविण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असे मतही मांडण्यात आले. सभेत वक्त्यांनी जनतेला आवाहन करताना सांगितले की, दैव, नशीब, शुभ-अशुभ, मुहूर्त, भविष्य अशा गोष्टींवर आंधळा विश्वास ठेवू नये.

या सर्व गोष्टी अंधश्रद्धा असून समाजाने वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणे आवश्यक आहे. समाज सुधारकांनी दिलेला विवेकवादी संदेश आत्मसात करून विज्ञाननिष्ठ जीवन जगावे, असेही यावेळी अधोरेखित करण्यात आले. कुणाच्याही हाती आपल्या आयुष्याचे सुख देणारा कोणताही चमत्कारी मंत्र नसतो, असा ठाम संदेशही यावेळी देण्यात आला.

या निषेध सभेत नवी मुंबईतील सुमारे २३ सामाजिक संस्था, संघटना आणि मंडळांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, नवी मुंबई यांनी सर्व सहभागी संस्था व उपस्थित नागरिकांचे आभार मानले.

या सभेत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, स्त्री मुक्ती संघटना, अन्वय व्यसनमुक्ती केंद्र, परिसर सखी विकास संस्था, वुमन वेल्फेअर फोरम, नवी मुंबई स्वयंसेवी समन्वय संस्था, शिव तुतारी प्रतिष्ठान, कविता डॉट कॉम परिवार, प्रभात ट्रस्ट, प्रतिष्ठा सोशल फोरम, टाऊन लायब्ररी, चेतना फाऊंडेशन, नवी मुंबई म्युझिक अँड ड्रामा सर्कल (वाशी), नागार्जुन सोशल फाऊंडेशन रिसर्च संस्था, अमृता महिला सामाजिक सेवा संस्था, मातृत्व सेवा सहकारी संस्था, अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि सत्यमेव जयते या संस्थांचा सहभाग होता.

तसेच मरठा समाज खारघर, प्रगती महिला मंडळ खारघर, शंभूराजे मित्र मंडळ खारघर, बावीस प्रतिज्ञा अभियान महाराष्ट्र आणि ग्रॅज्युएट असोसिएशन यांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.